जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 MAY 2017

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतून बसर्गे (ता. गडहिंग्लज) येथील श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थी, ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी ११० ट्रॉली गाळ काढला.

# विद्यापीठाने घेतले बसर्गे गाव दत्तक

## पाणी वाचविण्याचे आवाहन : श्रमदानातून ११० ट्राली काढला गाळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर/ गडहिंग्लज :** मुनिजन योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठाने गडहिंग्लज तालुक्यातील बसर्गे हे गाव दत्तक घेतले असल्याची घोषणा कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केली. उपस्थित शेतकरी, महिला, विद्यार्थी यांना संबोधित करताना नांदवडेकर यांनी पाण्याचे महत्त्व वेळीच ओळखून त्याची बचत करण्याचे आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित केलेल्या विशेष श्रमसंस्कार व जलसंधारण शिबिरात ते बोलत होते.

एन.एस.एस.च्या माध्यमातून बसर्गे गावाचा विकास आराखडा तयार करण्यात येत असून, या गावाचा कायापालट करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाकडून शक्य ती मदत करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या शिबिरामध्ये बसर्गेच्या ओढ्यावरील मुख्य बंधाऱ्यातील गाळ काढला. तसेच सर्व प्रभागांमधील घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थी व ग्रामस्थांसाठी योगवर्ग, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन केले होते.

पुणे अभियांत्रिकीचे तज्ज्ञ संचालक व बसर्गे गावचे सुपुत्र डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी बसर्गे ग्रामस्थांच्यावतीने शिवाजी विद्यापीठाला सर्व प्रकारचे सहकार्य करण्याविषयी आश्वस्त केले.

शिबिरामध्ये एन.एस.एस.चे स्वयंसेवक, एस. एम. हायस्कूलचे विद्यार्थी, महिला बचत गट सदस्य, ग्रामस्थ या सर्वांच्या श्रमदानातून एकशे दहा ट्रॉली गाळ काढला. महागावचे प्रा. पी. डी. पाटील यांचे 'थोडं तरी जगावे समाजासाठी', उत्तूरचे प्रा. राजेंद्र ठाकूर यांचे 'स्वातंत्र्यवीर सावरकरांचा राष्ट्रवाद', कोल्हापूरचे डॉ. अभिजित मुसळे यांनी 'ताणतणावमुक्त जीवन' आणि गारगोटीच्या केतकी पाटकर-ठाकूर यांनी मुलाखतीच्या माध्यमातून 'उद्योगातून महिला सबलीकरण' याविषयी मार्गदर्शन केले.

गडहिंग्लजच्या सभापती प्रा. जयश्री तेली, गटविकास अधिकारी सीमा जगताप, पोलीस निरीक्षक बिपीन हसबनीस, जिल्हा परिषद सदस्य हेमंत कोलेकर, रेखाताई हत्तरकी, वर्षादेवी नाडगोंडे, गंगाधर व्हस्कोटी यांनी शिबिरात भाग घेतला. शिबिराचे व्यवस्थापन प्रा. संजीवनी पाटील, प्रा. डी. जी. चिंगळीकर, सेवावर्धिनी संस्थेचे गुरुनाथ कुलकर्णी, अनुलोम संस्थेचे विजय हिरेमठ यांनी केले. बसर्गेचे उपसरपंच सुरेश मणिकेरी, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी या शिबिरात सहभाग घेतला.

### बसर्गे गावचे संकेतस्थळ तयार करणार

याप्रसंगी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी शिवाजी विद्यापीठ व ए. बी. सॉफ्टच्या सहकार्यातून बसर्गे गावाचे संकेतस्थळ तयार करणार असल्याचे जाहीर केले.

वर्षभरात गावात डिजिधन, जनधन, प्रधानमंत्री जीवनज्योती बिमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, अटल बिमा योजना, ठिबक सिंचन, जलसंधारण, विहीर पुनर्भरण, रेनवॉटर हार्वेस्टिंग इत्यादी योजनांविषयी जनजागरण मोहीम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

- डॉ. डी. के. गायकवाड, मुख्य समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAY 2017
लोकमत

# 'एमसीए सायन्स'साठी १० जूनला प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील शिवाजी विद्यापीठाच्या एमसीए सायन्स अभ्यासक्रमासाठी दि. १० जूनला सकाळी अकरा ते दुपारी साडेबारा यावेळेत प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय (सांगली) आणि यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा) अशी या परीक्षेची केंद्रे आहेत. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत सोमवार (दि. २२) ते दि. ३१ मेपर्यंत नियमित शुल्कासह आहे. त्यानंतर दि. २ जूनपर्यंत विलंब शुल्कासह विद्यार्थ्यांना अर्ज करता येतील. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे. अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

23 MAY 2017 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दुर्मीळ वृक्षारोपणाने जैवविविधता दिन उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ परिसर व रमणमळ्यातील वन विभाग कार्यालयाच्या आवारात भेरली माडाचे (पाम) रोपण करून सोमवारी जागतिक जैवविविधता दिन साजरा करण्यात आला. सोमवारी दुपारी चार वाजता फॅन थ्रोटेड लिझार्ड ही दुर्मीळ जातीच्या कोल्हापुरात आढळणाऱ्या सरड्यावर लघुफिल्म दाखविण्यात आली.

जैवविविधतेच्या बाबतीत जागतिक स्तरावर कोल्हापूरची मानचिन्हे ठरलेला गवा, डार्विनी सरडा, महाधनेश पक्षी सोनघंटा फूल, करवंद, ग्रेट ऑरेंज बटरफ्लाय, देवगांडूळ, भेरली माड हे झाड आदीचे संवर्धन व प्रचार-प्रसार व्हावा यासाठी लोकसहभाग वाढविण्याचा प्रयत्न आहे.

जिल्ह्यात आढणाऱ्या अनमोल जैवविविधतेच्या खजिन्याची सर्वसामान्यांना माहिती व्हावी, त्याचे जतन व संवर्धन व्हावे यासाठी जागतिक जैवविविधता दिनाचे औचित्य साधून हे उपक्रम सुरू होत आहेत. कोल्हापूरकरांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी मानद वन्यजीव संरक्षक रमण कुलकर्णी, पक्षीतज्ज्ञ फारुक म्हेतर, बारा तालुक्यांतील वन अधिकारी व शिवाजी विद्यापीठातील बोटनी विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जैवविविधता दिनानिमित रमणमळ्यातील वन विभागाच्या कार्यालयात रमण कुलकर्णी यांनी तयार केलेल्या फॅन थ्रोटेड लिझार्ड ही लघुफिल्म दाखविण्यात आली.



**कोल्हापूर : रमणमळा येथील वन विभाग कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करताना मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील. सोबत इतर.**